**ठळक बातम्या**

- युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी नोंदवला एफआयआर

- छत्तीसगढमधे ३७ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

- श्रीलंकेत चक्रीवादळाच्या बळींची संख्या १९३ वर, अनेक जण बेपत्ता

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३५० धावांचं आव्हान /सर्वाधिक ३५२ षटकार ठोकण्याचा रोहीत शर्माचा नवा विक्रम, तर विराट कोहलीचं शानदार शतक

**<><><><><>**

युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात च्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. तीव्र इच्छा, सामूहिक शक्ती, आणि संघभावनेनं काम करण्यावर विश्वास असेल तर कठीण कामातही यश मिळतं असं ते म्हणाले. या संदर्भात त्यांनी इस्त्रोनं मंगळ ग्रहासारख्या वातावरणात जीपीएस प्रणालीशिवाय ड्रोन उडवण्याच्या स्पर्धेची चित्रफित पाहिल्याचा अनुभव सामायिक केला. या स्पर्धेत पुण्यातल्या एका संघानं यश मिळवल्याचा उल्लेख त्यांनी केला.

हैदराबाद इथं विमानांच्या देखभाल, दुरुस्ती आणि संपूर्ण तपासणी केंद्राचं उद्घाटन, नौदलाच्या ताफ्यात स्वदेशनिर्मित आयएनएस माहे या युद्धनौकेचा झालेला समावेशाचा उल्लेखही त्यांनी केला. कृषी क्षेत्रातली देशाची प्रगती त्यांनी श्रोत्यांशी सामायिक केली.

देशानं ३५७ दशलक्ष टन इतक्या प्रमाणात अन्नधान्याचं उत्पादन करून ऐतिहासिक विक्रम केला असल्याचं ते म्हणाले. गेल्या काही वर्षांत मधाची निर्यात तिपटीहून जास्त वाढली असून, देशाचं मध उत्पादन दीड लाख टनांपेक्षा जास्त झालं आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद ,जपानमधल्या डेफ ऑलिम्पिक, तसंच जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारतानं मिळवलेलं यश याविषयी त्यांनी सांगितलं. दृष्टीहीन महिलांनी जिंकलेला पहिलाच टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक म्हणजे देशाच्या क्रीडा इतिहासातल्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे असं ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी देशाचा गौरव वाढवणाऱ्या सांस्कृतिक आणि इतर घडामोडींचाही उल्लेख केला. काही दिवसांपूर्वी साजरा झालेला संविधान दिन, तसंच वंदे मातरम् या गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल देशभरात होत असलेले कार्यक्रम, अयोध्येत राम मंदिरावर धर्मध्वजाचं आरोहण, कुरुक्षेत्रातल्या पांचजन्य स्मारकाचं लोकार्पण यांविषयी त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवानिमित्तानं विविध देशांत झालेल्या कार्यक्रमांची माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रीय संग्रहालयातले भगवान बुद्धांचे पवित्र अवशेषांचं भूतान, रशियासह, मंगोलिया, व्हिएतनाम आणि थायलंड अशा अनेक देशांमध्ये प्रदर्शित केले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. नुकत्याच झालेल्या जी ट्वेंटी परिषदेच्या निमित्तानंही आपण जागतिक नेत्यांना दिलेल्या भेटवस्तूंमध्ये स्थानिक भावनेवरच भर दिला असं ते म्हणाले. आगामी ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या खरेदीसाठीही नागरिकांनी देशात बनलेल्या वस्तुंची खरेदी करावी असं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड बाईट - MKB VOCAL FOR LOCAL**

देशाच्या हिवाळी पर्यटन क्षमतांबद्दल सांगिताना. हिवाळी पर्यटनासाठी हिमालयातील डोंगररांगाचा विचार करावा असं आवाहन त्यांनी केलं**.**

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात एकूण १५ बैठका होतील. या अधिवेशनात १३ विधेयकं चर्चेला येणार

आहेत. याशिवाय २०२५-२६ साठीच्या अनुदानासाठी पुरवणी मागण्यांवरील चर्चा आणि मतदानही या अधिवेशनात होईल.

या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज सकाळी सर्वपक्षीय बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. बैठक सकारात्मक वातावरणात झाल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी नंतर वार्ताहरांना सांगितलं. सभागृहाच्या नियमांनुसार मांडलेल्या कोणत्याही मुद्द्यावर सरकार चर्चेला तयार आहे, असं ते म्हणाले.

उद्यापासून सुरु होणारं हे अधिवेशन येत्या १९ डिसेंबरपर्यंत चालेल. या अधिवेशनात मतदार पुनरिक्षण, दिल्ली बॉम्बस्फोट तसंच परराष्ट्र संबधांबद्दल विरोधी पक्ष प्रश्न उपस्थित करतील अशी शक्यता आहे.

**<><><><><>**

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. काँग्रेसचे अन्य नेते सुमन दुबे, सॅम पत्रोदा यांच्यासह एकूण ९ जणांविरुद्ध  कारवाई केली जात आहे. ही कारवाई खोडसाळपणाची, आणि केवळ काँग्रेस नेत्यांना अडचणीत आणण्यासाठी केली जात असल्याची टीका काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे.

तर, नॅशनल हेराल्ड प्रकरण सरळसरळ भ्रष्टाचार आणि अफरातफरीचं असल्याचं भाजपा प्रवक्ते रविशंकर प्रसाद यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

संवेदनशीलता, प्रतिसाद देण्याची क्षमता आणि व्यावसायिकता वाढवून लोकांची पोलिसांबद्दलची धारणा बदलण्याची  गरज असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. रायपूर इथं पोलीस महासंचालकांच्या ६० व्या अखिल भारतीय परिषदेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.  नव्या फौजदारी कायद्यांबाबत जनजागृती करण्याची गरजही त्यांनी यावेळी व्यक्त केली. निर्जन बेटांना एकत्र जोडण्यासाठी नाविन्यपूर्ण धोरणं राबवा, NATGRID अंतर्गत एकत्रित केलेल्या डेटाबेसचा वापर करा, आणि कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करून या प्रणाली एकमेकांशी जोडा असे निर्देश प्रधानमंत्र्यांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिसांना दिले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदकं प्रदान केली. तसंच शहर पोलीस सुरक्षेत उत्कृष्ट काम केल्याबद्दल तीन शहरांना पारितोषिक प्रदान केलं. या परिषदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उपस्थित होते.

<><><><><>

छत्तीसगढच्या दंतेवाडा जिल्ह्यात आज डीव्हीसीएम, एसीएम कॅडरच्या ३७ नक्षलवाद्यांनीनी आत्मसमर्पण केलं. यातल्या २७ जणांवर ६५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांनी सांगितलं की पूना मार्गम या अभियानाला प्रतिसाद देत शेकडो नक्षली मुख्य प्रवाहात येत आहेत. या सर्वांना छत्तीसगढ राज्यसरकारतर्फे प्रत्येकी ५० हजार रुपयांचं त्वरित अर्थसहाय्य, कौशल्य प्रशिक्षण, शेतजमीन आणि पुनर्वसनासाठी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील, असं त्यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं.

<><><><><>

दितवा चक्रीवादळ बंगालच्या उपसागरातून तामिळनाडू पुद्दुचेरीच्या किनाऱ्यावरुन उत्तरेकडे सरकत असून त्याचा वेग आता १२ किलोमीटर प्रतितास असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. वादळाच्या पार्श्वभूमीवर चेन्नई, कुड्डुलोर, नागपट्टणम, आदी किनाऱ्यांवर धोक्याचा इशारा देणारे ५ क्रमाकांचे बावटे लावले आहेत. हे चक्रीवादळ धीमं पडत असल्याचंही हवामान विभागानं म्हटलं आहे. श्रीलंकेत या चक्रीवादळानं मोठं नुकसान केलं असून वादळामुळे बळी पडलेल्यांची संख्या १९३ झाली असून अनेक जण बेपत्ता आहेत. श्रीलंकेत भारतीय सैन्यदलान ऑपरेशन सागर बंधू राबवलं असून वायुदलानं श्रीलंकेतल्या पूरग्रस्त भागात हवाई मार्गानं जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरु ठेवला आहे. वायुदलाच्या विमानानं पुणे आणि बडोदा इथल्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाच्या तुकड्या चेन्नई इथं पोहोचल्या आहेत. श्रीलंकेच्या विविध पूरग्रस्त भागात वायुदलाची एमआय -१७ ही हेलिकॉप्टर तैनात केली आहेत. भारतीय वायुदलानं श्रीलंकेच्या कोटमाले भागातून पूरात अडकलेल्या आणि गंभीर जखमी असलेल्या २४ जणांना तातडीनं कोलबो इथल्या रुग्णालयात पोहोचवलं. भारताच्या राष्ट्रीय आपत्ती दलानं पुट्टलम भागात जीवनावश्यक मदत आणि वैद्यकीय साहित्य पोहोचवलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज झारखंडमध्ये रांची इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३५० धावांचं आव्हान ठेवलं आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारतानं निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३४९ धावा केल्या. रोहीत शर्मा आणि विराट कोहली यांनी धडाकेबाज १३६ धावांची भागिदारी केली. रोहीत शर्मा ५७ धावा करून बाद झाला. त्यानं एकदिवसीय क्रिकेटमधे सर्वाधिक षटकार मारण्याचा शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला. आफ्रिदीनं त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीत एकूण ३५१ षटकार ठोकले होते. आता रोहितनं ३५२ षटकारांचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

विराट कोहलीनं आज शतक ठोकलं. त्यानं १२० चेंडूत १३५ धावा केल्या, त्यात ११ चौकार आणि ७ षटकारांचा समावेश होता. के एल राहुलनं ६०, तर रविंद्र जडेजानं ३२ धावांचं योगदान दिलं.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या ३४ षटकात ७ बाद २३० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मुंबईच्या बोरिवली इथं आज केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते दिव्यांग बालकांसाठी आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाचं उद्घाटन केलं. गोयल यांनी आज मंडपेश्वर पब्लिक स्कूलचंही उद्घघाटन, तसंच पालिकेच्या शाळांमधल्या ६० हजार विद्यार्थिनींना दरमहा ४ लाख २० हजार सॅनिटरी पॅड मोफत वाटण्याच्या उपक्रमाचा प्रारंभही केला.

**<><><><><>**

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरीचं विजेतेपद ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडगोळीनं पटकावलं आहे. लखनौमधे झालेल्या अंतिम सामन्यात आज त्यांनी जपानच्या काहो ओसावा आणि माई तानाबे या जोडीचा १७-२१, २१-१३, आणि २१ -१५ असा पराभव केला.

**<><><><><>**

मतदारयाद्या पुनरिक्षणाची मुदत केंद्रीय आयोगानं आठवडाभरानं वाढवली आहे. ९ राज्य आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमधे सध्या ही प्रक्रीया सुरु आहे. सुधारित अधिसूचनेनुसार मतदारयादीत नाव नोंदणीसाठी ११ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येईल. प्रारूप मतदार याद्या १६ डिसेंबरला, तर अंतिम मतदारयाद्या येत्या १४ फेब्रुवारीला प्रसिद्ध होतील.

<><><><><>

हाँगकाँगमध्ये एका संकुलातल्या इमारतीमध्ये आगीच्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १४६वर पोचली आहे. दुर्घटनेच्या आजच्या पाचव्या दिवशीही शोधकार्य पूर्ण झालेलं नसल्याने दीडशे जणांचा अजून पत्ता लागलेला नाही. या इमारतीच्या नूतनीकरणासाठी ज्वालाग्राही तसंच कमी दर्जाचा माल वापरल्याप्रकरणी आठ जणांना हाँगकाँगच्या भ्रष्टाचार प्रतिबंधक दलाने अटक केली आहे.

<><><><><>

इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यन्याहू यांनी आपल्यावर सुरु असलेल्या भ्रष्टाचारांच्या खटल्यांबाबत क्षमाशीलता दाखवण्याची विनंती राष्ट्राध्यक्ष आयझॅक हर्झोग यांच्याकडे केली आहे. अध्यक्षांच्या कार्यालयानं या विनंतीची दखल घेत याबाबत जबाबदारीनं निर्णय घेतला जाईल, असं म्हटलं आहे. नेत्यनाहू यांच्यावर २०१९मध्ये लाचलुचपत, घोटाळा आणि विश्वासघात याबाबतचे तीन खटले सुरु आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही हर्झोग यांच्याकडे अशी विनंती केली आहे.

//<><><><><>//